● गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ११५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४   8390098886   yuva.aadarsh@gmail.com   8390048886

जिवेश्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/   https://youtube.com/@Yuva_Aadarsh/   https://twitter.com/Yuva_aadarshjln/   RNI: MAHMAR/2019/78282

# नारायण कुचे यांची दादागिरी

## पन्नास-पन्नास कार्यकर्त्यांसह बुधवर, मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न!



दीपक शेळके

जालना - महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २०२४ साठी बुधवार (दि २०) रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. बदनापूर मतदार संघात महायुती भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नारायण कुचे हे सकाळपासूनच बुथवर पाहणीसाठी निघाले होते. पन्नास पेक्षा अधिक कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचा फौजफाटा घेऊन नारायण कुचे हे बिनधास्त बुथच्या आतमध्ये जात होते. केवळ बुथच्या आवारातच नव्हे तर मतदान प्रक्रिया ज्या ठिकाणी सुरु आहे त्या ठिकाणी नारायण कुचे पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा लवाजमा घेऊन प्रवेश करत होते. बदनापूर जिल्हा परिषद शाळेच्या बुथवर एका महिला कर्मचाऱ्यांने त्यांच्या कार्यकर्त्यांना रोखले देखील. पण ऐकतील ते नारायण कुचे अथवा त्यांचे कार्यकर्ते कसले. मांडवा, नजिकपांगरी, सेलगाव व त्यानंतर बदनापूर जिल्हा परिषद शाळा अशा मतदार संघातील बुथवर नारायण कुचे यांची दादागिरी पहायला मिळाली. हा एकप्रकारे मतदारांना प्रभावित करून मतदारांवर दबाव निर्माण करण्याचा कुचे यांना प्रयत्न होता. या संदर्भात बदनापूर विधानसभा निवडणूक अधिकारी सरिता सुत्रावे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या व्हॉटस्अप क्रमांकावर काही व्हिडीओ व फोटोग्राफ पाठवून त्यांची प्रतिक्रीया जाणून घेण्याचा प्रयत्न युवा आदर्शच्यावतीने करण्यात आला. यावर श्रीमती सुत्रावे यांनी मी चेक करून पाहते असे म्हटले आहे.

आपल्या विवादीत बोलण्याने नेहेमीच चर्चेत असणारे नारायण कुचे यांनी प्रचारादरम्यान मराठा कार्यकर्त्यांला हातपाय तोडण्याची धमकी त्यांच्याच कार्यकर्त्यांकडे दिली यांची मतदार संघात बरीच चर्चा झाली. त्यानंतर तर थेट जातीधर्माबद्दल वक्तव्य केलेली एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. या क्लिपमध्ये स्पष्टपणे पैसे देण्याबाबतचा उल्लेख होता. मात्र, मतदानाच्या एक दिवस अगोदर कुचें यांनी सारवासारव करत माझा आवाज काढून कुणीतरी हे केल्याचे म्हणून वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. मुळात या ऑडिओ क्लिपमध्ये एका विशिष्ट जातीला हिन समजून त्यांना अगोदर पैसे द्या असा म्हटले आहे. या प्रकाराची निवडणुक आयोग दखल घेईल का असा प्रश्न उपस्थित होत. आहे.

प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर देखील मतदानाच्या दिवशी महायुती भाजपाच्या उमेदवारांकडुन बिनधास्त प्रचार सुरु होता. बदनापूर जिल्हा परिषद शाळेच्या बुथवर ही कुचे यांनी कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी मुस्लीम समाज विरोधकांना एक गठ्ठा मतदान करण्याची शक्यता असून मराठा आरक्षणामुळे मनोज जरांगे हे आपल्या विरोधात प्रचार करतील अशी शक्यता होती. असे म्हणत विरोधकांचे हे मुद्दे फेल गेले त्यामुळे आपला विजय पक्का असल्याची समजूत नारायण कुचे यांनी काढत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.









युवा आदर्श

**पेटीबंद ...**

पुढाऱ्यांचे भवितव्य
ई व्हीएममध्ये बंद
कसा लागे निकाल
कुणाला नाही गंध
माहीत नाही कसा
आतून निघे समंध
युती आघाडी धर्म
अस्वस्थ हो संबंध
सुस्तवे आरोप तोफ
गोळाफेक अंधाधुंद
अवनती खूप दिसे
डोळस सत्तेत अंध
बोलत राही सतत
वाचाळले अनिर्बंध
जरा होतीलं शांत
निखळून पडे बंध
जिंकून येऊ आम्ही
अज्ञाना असे आनंद
निकाल लागल्यावर
पुन्हा चाले रणकंद
निखळ वृत्ती हरवते
का नाही अद्वैतानंद
जय पराजय स्विकारे
जसा सुखावे मृदगंध

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# अंबडमधील एका बुथवर दिव्यांगांसाठीची व्हिल चेअर दुपारपर्यंत धुळखात पडून

**जालना । प्रतिनिधी -** निवडणुक आयोगाकाडून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी हर संभव प्रयत्न करण्यात येत आहे. त्यातच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होतांना त्रास होऊ नये या हेतूने राज्य निवडणूक आयोगाने प्रत्येक केंद्रावर आवश्यकतेप्रमाणे व्हिल चेअर, व्हिल चेअर व्हॅन, दिव्यांग सुलभ बसेस आदींची व्यवस्था करण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. याच प्रक्रियेत जालना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी देखील जिल्ह्यातील पाचही मतदार संघातील दिव्यांग मतदारांसाठी ज्या ज्या बुथवर दिव्यांग मतदार आहेत अशा बुथवर व्हिल चेअर ठेवण्याच्या सुचना केल्या होत्या मात्र, अंबड मधील जिल्हा परिषदेच्या उर्दु शाळेतील एका बुथवर व्हील चेअर दुपारी सुमारे दोन वाजेपर्यंत चक्क धुळ खात पडून होती. या बुथवर मतदान करण्यास पोहचलेल्या एका दिव्यांग व्यक्तीकडे कुणाचेही लक्ष गेले नाही. परिसरात असलेल्या पोलीसांनीही केवळ बघ्याची भुमिका घेतली. या शाळेत पाच बुथ होते. पत्रकारांनी याबाबत एका पोलीस कर्मचाऱ्याला विचारले असता त्यांने सहज सांगितले की, तो इकडच्या बुथचा मतदार नाही. त्या बुथवाले पाहतील काय करायचे ते म्हणत आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. संबंधीत बुथ प्रमुखांच्या ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी धुळ खात पडलेली व्हिलचेअर बाहेर काढली. मतदान करण्यासाठी आलेल्या दिव्यांगांची येतांना झालेली हेळसांड





जातांना टाळण्यासाठी पत्रकारांनी भूमिका बजावली. आता या ठिकाणी दुपारपर्यंत किती दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यांना काय त्रास झाला याचा विचार निवडणुक आयोग करणार का? अशा बाबी निवडणुक निर्णय अधिकारी अथवा बुथवर लक्ष देण्याऱ्या अधिकाऱ्यांच्या नजरेस पडू नये ही लाजीरवाणी बाब म्हणावी लागेल.

एकही मतदार, मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहता कामा नये, हे उद्दिष्टं साध्य करण्यासाठी, राज्य निवडणूक आयोगामार्फत प्रत्येक मतदान केंद्रांवर वेगवेगळ्या सुविधा देण्यात येत असल्यातरी जिल्हा व मतदार संघ निहाय अधिकारी -कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निवडणुक आयोगाच्या उद्दिष्ट हे साध्य होतांना दिसत नसल्याचे चित्र आहे.





**जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी एका पत्रकार परिषदेस बुथ व फोटोग्राफ व व्हिडीओ काढण्याबाबत सुचना देतांना बुथच्या आत मोबाईल अथवा कॅमेरे घेऊन जाता येणार नसल्याचे स्पष्ट केले होते. याबाबत सुचना संबंधीतांना दिल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या पत्नी अश्विनी पांचाळ यांनी जालना येथील मत्स्योदरी महाविद्यालय येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी बुथच्या आत फोटो घेऊन मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.**

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात ७२ टक्के मतदान

## भोकरदन आघाडीवर तर जालना सर्वात मागे

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर आणि १०३-भोकरदन या विधानसभा मतदारसंघातील १ हजार ७५५ मतदान केंद्रांवर आज मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत मतदान पार पडले. उशिरा मिळेलेल्या माहितीनूसार ७२.३० टक्के मतदान झाले आहे. यात भोकरदन मतदार संघ आघाडीवर असून येथे ७७.२ टक्के मतदान झाले असून जालना सर्वांत मागे आहे. जालन्यात ६३.६३ टक्के मतदान झाले आहे.

बुधवार (दि २०) पार पडलेल्या मतदान प्रक्रियेनुसार सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघनिहाय झालेले मतदान टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. यामध्ये ९९-परतूर ६९.०४ टक्के, १००-घनसावंगी ७७.०६ टक्के, १०१-जालना ६३.६३ टक्के, १०२-बदनापूर ७४.६ टक्के आणि १०३-भोकरदन ७७.२ टक्के असे एकूण सरासरी ७२.३० टक्के मतदान झाले होते. उशिरापर्यंत काही बुथवरील मतदान प्रक्रिया सुरु असल्याने या आकडेवारीत काहीसा बदल होण्याची शक्यता आहे.

विधानसभा मतदार संघातील काही अनेक ठिकाणी मतदानाची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती. पाचही विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी मतदारांनी उस्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व मतदारांचे आभार मानले.





## ॲक्शन, स्माईल प्लीझ ...

निवडणुक विभागाच्या जिल्हा महिती कार्यालयाकडून देण्यात आलेल्या एका वाहनांने घनसावंगी मतदार संघाच्या पाहणी दौऱ्यावर असलेल्या पत्रकारांना घनसांवगी मतदार संघात कर्मचाऱ्यांनी उद्धट, उर्मठ भाषा वापरली. यासंदर्भात वरिष्ठांकडे या प्रकाराची तात्काळ पत्रकारांनी तक्रार केली आहे. जर पत्रकारांशी या व्यक्तीची बोलण्याची भाषा अशी असेल तर निवडणुक प्रक्रियेत सहभागी सामान्य कर्मचाऱ्यांशी, शिक्षकांशी याची वागणूक कशी असेल. संबंधीतांचे फोटो काढण्यासाठी पत्रकारांनी मोबाईल हातात घेतात या कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या पोझ दिल्या. जसे काही येथे चित्रपटातील शुटींग सुरु आहे... ॲक्शन, स्माईल प्लीझ... त्यांच्या हावभावावरुन हेच लक्षात येते की तुम्ही काढा फोटो आमचे काहीही होत नाही. या प्रकाराची सविस्तर चौकशी करण्यात यावी अशी मागणी पत्रकारांकडून होत आहे.

# माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मूळ गावी लोणी येथे बजावला मतदानाचा हक्क

**आष्टी । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याकरता तत्कालीन मंत्री पदाच्या कार्यकाळात चार हजार सातशे कोटी रुपये निधी आपण केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून आणला असून गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात विधानसभेचा सदस्य म्हणून परतूर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करत असताना आपण तीन कोटी रुपयांचा निधी परतुर विधानसभा मतदारसंघाच्या विकासाकरिता आणला असून. यात वॉटर ग्रीड योजनेसह मतदार संघातील ३५१ विजेचा आणि रस्त्याचा जाळ निर्माण करत मोठ्या प्रमाणावर विकास कामे केल्याने परतूर विधानसभा मतदारसंघातील जनता मला विकासाच्या मुद्द्यावर प्रचंड मतांनी विजयी करेल असा आत्मविश्वास महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

परतूर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदार संघाचे भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री मा श्री आमदार बबनराव लोणीकर साहेब यांनी आज महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आज आपल्या मूळ गावी लोणी येथे मतदानाचा हक्क बजावला. यावेळी उपस्थित पत्रकारांशी ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्याबरोबर महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांचे शेतीचे सर्व प्रकारचे कर्ज सरसकट माफ करून सातबारा कोरा करणार याबरोबरच शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्माननिधीत भरघोस वाढ करून वर्षाला बारा हजार रुपये ऐवजी १५ हजार रुपये देणार या बरोबर च शासनाने शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रमी पिक विमा देण्याची घोषणा केली आहे त्यानुसार शेतकऱ्यांना आता चार दिवसात पिक विमा योजनेची रक्कम थेट खात्यात मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पिक विमा प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत कोणत्याही परिस्थती पिक नुकसान भरपाई २५ टक्के अग्रमी शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी सूचना कृषिमंत्री धनंजय मुढे यांनी केली आहे. त्यानुसार धाराशिव, आकोला, परभणी, जालना, नागपूर, अमरावती या जिल्ह्यामधील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांना ६१३ कोटी रुपयाची नुकसान भरपाई लवकर च शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार असल्याची माहिती या वेळी महायुतीचे उमेदवार आमदार बबनराव लोणीकर यांनी या वेळी पत्रकारांना दिली.

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक



गावात सिमेंट कॉंक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली.


# या लढतीकडे लक्ष; निकालाची प्रतिक्षा

**मुंबई -** राज्यामध्ये मतदानाची प्रक्रिया तर पार पडली, आता सर्वाचं लक्ष लागलं आहे ते म्हणजे २३ नोव्हेंबर रोजी मतदारांचा कल नेमका कुणाला मिळतोय याकडे. तुरळक अपवाद वगळता राज्यातील मतदान हे शांततेत पार पडलं. पण राज्यातल्या काही भागात हायव्होल्टेज लढती पाहायला मिळाल्या. त्याच्या चर्चाही संपूर्ण निवडणूक होईपर्यंत रंगल्या होत्या. अनेकजण याबद्दल अंदाज व्यक्त करत होते. पण दिवसेंदिवस त्यांच्या अंदाजातही बदल होताना पाहायला मिळत होता. कोपरी पाचपाखाडीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. त्यांच्याविरोधात ठाकरेंच्या शिवसेनेचे केदार दिघे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. राज्यात आणखी एक महत्त्वाची बिग फाईट आहे ती म्हणजे माहिम विधानसभा मतदारसंघाची. कारण तिथे राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तर ठाकरेंचे महेश सावंतही याच मतदारसंघातले उमेदवार आहेत. अशीच एक तिहेरी लढत वरळीतही पहायला मिळाली. वरळीत शिंदे गटाचे मिलिंद देवरा, ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे आणि मनसेचे संदीप देशपांडे आपलं नशीब आजमावताहेत. दुसरीकडे वांद्रे पूर्वमध्ये झिशान सिद्दीकी विरुद्ध वरुण सरदेसाई अशी लढत रंगल्याचं दिसून आलं. कोकणात कुडाळमध्ये निलेश राणे विरुद्ध वैभव नाईक असा थेट सामना रंगला. पश्चिम महाराष्ट्रातली सर्वात मोठी बिग फाईट म्हणजे बारामती विधानसभा मतदारसंघ. बारामतीमध्ये अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी काका-पुतण्यांची थेट लढत पाहायला मिळाली. यानंतर सगळ्यात जास्त हाय व्हॉल्टेज लढत होती ती कागल विधानसभा मतदारसंघातली. कारण कागलमध्ये दोन कट्टर विरोधक आमने-सामने आहेत. राष्ट्रवादीतून हसन मुश्रीफ तर शरद पवारांच्या पक्षाकडून समरजीत घाटगेंना उमेदवारी देण्यात आली होती. या मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे ८१ टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याची माहिती आहे.

जालना विधानसभा मतदार संघात कैलास गोरंट्याल व अर्जुन खोतकर तर भोकरदन मतदार संघात संतोष दानवे विरोधात चंद्रकांत दानवे यांच्यात थेट लढत पहायला मिळाली.

# अजब गजब इश्क या चित्रपटाची घोषणा, निर्मात्यांनी पोस्टर लॉंच केले

बॉलिवूडमध्ये क्शन आणि क्राईम थ्रिलरच्या दरम्यान प्रेमाचा हंगाम पुन्हा एकदा परत येत आहे. अजब गजब इश्क चित्रपटाच्या निर्मात्यांनी नवीन चेहऱ्यांसह एका अतिशय सुंदर सिनेमाची घोषणा केली आहे, ज्याचे पोस्टर मुंबईत हम साथ साथ है सारख्या चित्रपटात काम केलेले अभिनेते महेश ठाकूर यांच्या उपस्थितीत लॉंच करण्यात आले. हा रोमॅंटिक कॉमेडी चित्रपट इंदूरमध्ये शूट केला जाणार आहे ज्यामध्ये अनेक ट्विस्ट आणि टर्न असतील. एका सामान्य प्रेमकथेशिवाय, चित्रपटात बरेच काही आहे जे तुम्हाला पाहायला मिळेल.




अधिश्री फिल्म्सच्या बॅनरखाली तयार होणारा हा चित्रपट दिग्दर्शक धनंजय कुमार सिंग यांनी लिहिला असून गगन वर्मा यांनी निर्मिती केली आहे. प्रसिद्ध चित्रपट आणि टीव्ही अभिनेते महेश ठाकूर यांनी या चित्रपटासाठी निर्माता आणि दिग्दर्शकाचे अभिनंदन केले आणि सांगितले की त्यांनी चित्रपटात मुलीच्या वडिलांची भूमिका साकारली आहे. धनंजय कुमार सिंग एक यशस्वी दिग्दर्शक आहे आणि मला खात्री आहे की तो आणखी चांगला चित्रपट बनवेल.

निर्माते गगन वर्मा या चित्रपटाच्या कथेला आपला नायक मानतात. पोस्टर जितका रंगीबेरंगी आणि सुंदर दिसतो तितकाच हा चित्रपट प्रेक्षकांनाही तितकाच सुंदर आणि रंगतदार वाटेल, असे ते म्हणाले. अभिनेता परम सिंग या चित्रपटात राजवीरची मुख्य भूमिका साकारणार आहे. अब्बास मस्तानच्या मशीन आणि नवरस कथा कोलाज या चित्रपटात इशान शंकरही महत्त्वाच्या भूमिकेत आहे. त्याचे पात्र खूपच मनोरंजक आहे. चित्रपटात संगीतही महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

चित्रपटाचे निर्माते गगन वर्मा यांनी सांगितले की, मी दहा वर्षांपासून वैद्यकीय व्यवसायात आहे. त्यानंतर संगीत, सिनेमा आणि लेखनाच्या आवडीमुळे ते चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात आले. अर्थात अजब गजब इश्क ही एक प्रेमकथा आहे पण तिची कथा रिअल इस्टेटमधील फसवणुकीच्या घटनांपासून प्रेरित आहे. अजब गजब इश्क या चित्रपटाचे शूटिंग २३ नोव्हेंबरपासून इंदूर शहरात सुरू होणार आहे. या चित्रपटात ईशान शंकर, महेश ठाकूर, क्रिती वर्मा, बिंदा रावल, गगन वर्मा, धर्मेंद्र बिलोटिया, शौर्य सक्सेना आणि साक्षी रॉय हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

यावेळी गगन वर्माचा दुसरा प्रोजेक्ट, हॉरर थ्रिलर चित्रपट हाफ चे पोस्टर देखील लॉंच करण्यात आले, ज्याचे स्क्रिप्ट लेखन प्रगतीपथावर आहे.

### एक्झिट पोलच्या अंदाज...

# राज्यात महायुतीचे सरकार?

**मुंबई -** गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून काढणाऱ्या विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया बुधवारी संपन्न झाली. विधानसभा निवडणुकीसाठी यंदा राज्यभरात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी ५८.२२ टक्के मतदान झाले. ही मतदानाची प्रक्रिया संपल्यानंतर आता विविध संस्थांच्या मतदानोत्तर चाचण्यांचे निकाल जाहीर झाले आहेत. यामधून यंदाच्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात कोणाची सत्ता येणार, याबद्दल संकेत मिळत आहेत.

**राज्यातील अन्य एक्झिट पोल्सचे निकाल खालीलप्रमाणे**

**१. इलेक्टोरल** EO Exit Poll **२०२४**
भाजप-७८
कॉंग्रेस-६०
शरद पवार गट-४६
ठाकरे गट-४४
शिंदे गट-२६
अजित पवार गट-१४
इतर-२०

**२. पोल डायरी**

महायुती - १२२-१८६
भाजप - ७७-१०८
शिवसेना (शिंदे गट) - २७-५०
राष्ट्रवादी (अजित पवार गट) - १८-२८
महाविकास आघाडी - ६९-१२१
कॉंग्रेस - २८-४७
शिवसेना (ठाकरे गट) - १६-३५
राष्ट्रवादी (शरद पवार गट) - २५-३९
इतर - १२-२९

**३. चाणक्य एक्झिट पोल**
महायुती १५२ ते १६० जागा
भाजप-९०
शिंदे गट- ४८
अजित पवार गट-२२
महाविकास आघाडी १३० ते १३८ जागा
कॉंग्रेस-६३
ठाकरे गट-३५
शरद पवार गट-४०
इतर- ६ ते ८

**४.** MTRIZE
महायुती १५०-१७०
मविआ ११०-१३०
इतर ८-१०

४. REPUBLIC Exit Poll २०२४

महायुती १३७-१५७
मविआ १२६-१४६
अन्य २-८

6. News 24 P-MRQ
महायुती १३७-१५७
मविआ १२६-१४६
इतर २-८

7. ZEE I
महायुती ११४-१३९
मविआ १०५-१३४
इतर ०-८

**८. लोकशाही रुद्र**
महायुती - १२८-१४२
भाजप - ८०-८५
शिवसेना (शिंदे गट) - ३०-३५
राष्ट्रवादी (अजित पवार गट) - १८-२२
महाविकास आघाडी - १२५-१४०
कॉंग्रेस- ४८-५५
शिवसेना (ठाकरे गट) - ३९-४३
राष्ट्रवादी (शरद पवार गट) - ३८-४२
इतर - १८-२३

9. JVC
महायुती १५०-१६७
मविआ १०७-१२५
इतर १३-१४

10. Peoples Pulse
महायुती १८२
मविआ ९७
इतर ९

11. SS GROUP HYDRBD
महायुती १२७-१३५
मविआ १४७-१५५
इतर १०-१३

विदर्भ (एकूण जागा ६२)
मविआ ३३-३५
महायुती २६-२७
इतर २-३

पश्चिम महाराष्ट्र (एकूण जागा ७०)
मविआ ४०-४२
महायुती २७-२८
इतर २-३

मराठवाडा (एकूण जागा ४६)
मविआ २७-२८
महायुती १७-१८
इतर २-३

मुंबई (एकूण जागा ३६)
मविआ १८-१९
महायुती १७-१८
इतर १-२

उत्तर महाराष्ट्र (एकूण जागा ३५)
मविआ १५-१६
महायुती १८-२१
इतर २

कोकण (एकूण जागा ३९)
मविआ १४-१५
महायुती २२-२३
इतर १-२

**चाणक्यच्या एक्झिट पोल्समध्ये महायुतीचा निसटत्या फरकाने विजय होण्याचा अंदाज**

चाणक्य एक्झिट पोलच्या अंदाजानुसार यंदाच्या निवडणुकीत महायुतीची सरशी होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत महायुतीला १५२ ते १६० जागा मिळण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला १३० ते १३८ जागांवर विजय मिळेल. तर अपक्षांना ६ ते ८ जागांवर विजय मिळेल, असा अंदाज चाणक्यच्या एक्झिट पोलमध्ये वर्तविण्यात आला आहे.

चाणक्यच्या एक्झिट पोलनुसार भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. भाजपला ९० जागा मिळतील, असा अंदाज आहे. तर शिंदे गटाला ४८ जागा आणि अजित पवार गटाला २२ जागांवर विजय मिळण्याचा अंदाज आहे. तर महायुतीसोबत असलेल्या सहयोगी उमेदवारांना २ जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे.

तर दुसरीकडे महाविकास आघाडीत कॉंग्रेस ६३ जागा मिळवत सर्वात मोठा पक्ष ठरेल. या निवडणुकीत ठाकरे गटाला ३५ पेक्षा अधिक जागांवर विजय मिळू शकतो. तर ४० जागांवर शरद पवार गटाचे उमेदवार विजयी ठरतील. तर या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि तिसऱ्या आघाडीच्या उमेदवारांना मिळून ६ ते ८ जागांवर विजय मिळण्याची अंदाज चाणक्यच्या एक्झिट पोलमध्ये वर्तविण्यात आली आहे.







विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार (दि २०) रोजी मतदान पार पडले. घनसावंगी विधानसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया सुरु असतांनाही अशा प्रकारची फलकबाजी करत निनावी प्रचार एका पक्षाकडुन करण्यात येत होता. मुळात या मतदार संघात यापुर्वी झालेल्या २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राजेश टोपे यांचा निसटता विजय झाला होता. आणि त्याच अनुषंगाने 'आता गोळी कानाखालुन नाही तर डोक्यात घुसणार', 'आता पल्टी बसणार' अशा आशयाचे मतदारांना प्रभावित करण्यासाठी फलक लावल्याचे दिसून येते. आता या फलकावर कोणत्याही पक्षाचे नाव नसल्यामुळे निवडणुकीच्या दिवशीही हे थाटात प्रचार करत होते. निवडणुकीच्या खर्चा कुण्या उमेदवाराने या फलकांचा हिशोब दिला का? असा प्रश्न निर्माण होत आहे. अशा कृल्प्त्या वापरून उमेदवार आदर्श आचारसंहितेच्या जाळ्यात अडकणार नाही याची पुरेपुर दक्षता घेत असल्याचे दिसून येत आहे.











विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार (दि २०) मतदान प्रक्रिया पार पडली. जालना विधानसभा मतदार संघातही मतदारांचा प्रतिसाद पहायला मिळाला अनेक बुथवर रांगा लागलेल्या दिसून आला. थंडी असल्याने सकाळी ७ ते ११ पर्यंत मतदानही थंडावलेलेच होते. त्यांनतर मतदारांनी बुथवर रांगा लावल्या. वयोवृद्ध, दिव्यांग, आजारी मतदारांना मतदान केंद्रावर पोहचवून बुथवर नेण्यासाठी मदतीचा हात देण्यात आला. दानकुंवर येथभल मतदान केंद्रावर स्काऊट गाईडच्या मुली मदतीसाठी सरसावल्या. (छाया- किरण खानापुरे)

## 'आर्दश' मतदान केंद्रावरील आदर्शता...






विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार (दि २०) मतदान प्रक्रिया पार पडली. जालना विधानसभा मतदार संघातही मतदारांचा प्रतिसाद पहायला मिळाला. निवडणुक विभागाकडुन जिल्ह्यात सखी मतदान केंद्र, युवा मतदान केंद्र, वेबकास्टींग, थीमबेस, क्रिटीकल, पीडब्ल्यूडी अशाच प्रकारे आदर्श मतदान केंद्र होती. यात जालना विधानसभा मतदार संघात चार आदर्श मतदार केंद्र होती. या मतदान केंद्रावर तशा आशयाने सजावटही करण्यात आली होती. तेथे लावलेल्या फलकावर 'आर्दश' मतदान केंद्र असा उल्लेख असल्याने या केंद्रावरी आदर्शता दिसून आली. मुळात निवडणुक प्रक्रियेतील कोणत्याही अधिकाऱ्यांच्या ही बाब लक्षात येऊ नये? याला निष्काळजीपणा म्हटल्यास वावगे ठरणार नाही?

# सांगोल्यात कुणाची बाजी; कर्जत जामखेड हाय व्होल्टेज लढत

सांगोल्यातही एक मोठी लढत पाहायला मिळाली. ती म्हणजे 'काय झाडी काय डोंगार' फेम शिवसेनेचे शहाजीबापू पाटील विरुद्ध ठाकरे गटाचे दीपक साळुंखे यांच्यात. या लढतीत कोण बाजी मारणार हेही पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. आणखी एक महत्त्वाची बिग फाईट म्हणजे सांगलीच्या कवठेमहांकाळ विधानसमभा मतदारसंघातली. संजयकाका पाटील विरुद्ध रोहित पाटील अशी थेट लढत या निवडणुकीत रंगली. ही निवडणूक आता जनतेनं हातात घेतलीय अशी प्रतिक्रिया या दोन्ही नेत्यांनी यावेळी दिली.

आता आणखी एका लढतीकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं ती म्हणजे कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघाकडे. रोहित पवार विरुद्ध राम शिंदे यांच्यात ही थेट लढत झाली. तर तिकडे जळगाव ग्रामीणमध्ये शिवसेनेच्या गुलाबराव पाटील विरुद्ध राष्ट्रवादीच्या गुलाबराव देवकर असा सामना बघायला मिळाला.

नांदगावमध्ये सुहास कांदे विरुद्ध गणेश धात्रक विरुद्ध समीर भुजबळ अशी तिहेरी लढत पाहायला मिळाली या मतदारसंघात हाय होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. तुझा मर्डर फिक्स आहे अशी थेट धमकीच शिंदेंच्या सुहास कांदेंनी समीर भुजबळांना दिल्याचं दिसून आलं. मराठवाड्यात परांडा विधानसभेत तानाजी सावंत विरुद्ध राहुल मोटे अशी लढत पहायला मिळतेय. तर यावेळी सर्वाधिक चर्चेत आलेल्या बार्शी मतदारसंघामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेल्या राजेंद्र राऊत यांच्यासमोर ठाकरे गटाच्या दिलीप सोपल यांचं आव्हान आहे. विदर्भातील रामटेकमध्ये आशिष जैस्वाल विरुद्ध विशाल बरबटे यांच्यात सामना रंगणार आहे. विदर्भात आणखी एक महत्त्वाची लढत म्हणजे सावनेर विधानसभा मतदारसंघातली. कारण इथे आशिष देशमुखांविरोधात अनुजा केदार असा सामना रंगणार आहे.

## भास्कर दानवे यांनी सपत्नीक बजावला मतदानाचा हक्क



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार (दि २०) मतदान प्रक्रिया पार पडली. जालना विधानसभा मतदार संघात भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर दानवे यांनी पत्नी सौ सुशीलाताई दानवे यांनी मतदान केले.

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी आपल्या म तदानाचा हक्क बजावावे, विकसित भारताच्या निर्मितीसाठी, महाराष्ट्राला प्रगतीपथावर आरुढ ठेवण्यासाठी तसेच आपली भारतीय लोकशाही समृध्द करण्यासाठी अवश्य मतदान करा असे आवाहन करीत भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे आणि त्यांच्या पत्नी सौ. सुशीलताई दानवे यांनी जालना येथील जैन इंग्लिश स्कूल येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला.



विधानसभा निवडणूकीसाठी बुधवार (दि २०) रोजी मतदान पार पडले. यावेळी जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवारी आ. कैलास गोरंट्याल यांनी सह परिवार मतदानाचा हक्क बजावला.



विधानसभा निवडणूकीसाठी बुधवार (दि २०) रोजी मतदान पार पडले. यावेळी जालना विधानसभा मतदार संघातील महायुती शिवसेना (शिंदे गट) उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी परिवारासह मतदान केले.



विधानसभा निवडणुक २०२४साठी मतदान प्रक्रिया बुधवार (दि २०) रोजी पार पडली. यावेळी जालना विधानसभा मतदार संघातील एका बुथवर येथील उद्योजक कालीका स्टिलचे संचालक घनश्यामसेठ गोयल यांनी कुटूंबियासह मतदानाचा हक्क बजावला





विधानसभा निवडणूकीसाठी बुधवार (दि २०) रोजी मतदान पार पडले. यावेळी जालना विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार अब्दुल हाफीज यांनी मित्र परिवारासह मतदानाचा हक्क बजावला. दुसऱ्या छायाचित्रात बुथवर मतदानारासाठी अशा रांगा लागल्या होत्या. (छाया- किरण खानापुरे / जावेद तंबोली)






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.